**ठळक बातम्या**

- लष्करी, वाणिज्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली भागिदारी बळकट करण्यावर भारत आणि अमेरिका यांच्यात सहमती

- एफआयआर दाखल करण्यात कोणताही विलंब न करण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे राज्यातल्या पोलिस दलाला आदेश

- प्रयागराज इथल्या कुंभमेळ्याला विक्रमी ५० कोटी भाविकांची भेट

- १७ वर्षात पहिल्यांदाच BSNL ला तिमाही निकालात नफा

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा समारोप, २०१ पदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेत दुसऱ्या स्थानी

**<><><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यात लष्करी, वाणिज्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली भागिदारी आणखी बळकट करण्यासाठी कॉपॅक्ट या नव्या उपक्रमावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीनंतर प्रसिद्ध झालेल्या संयुक्त निवेदनात याविषयी अधिक माहिती दिली आहे.

**होल्ड**

*संरक्षण भागीदारीसाठी नव्या दहा वर्षांच्या आराखड्यावर स्वाक्षरी केल्याची घोषणा भारत आणि अमेरिकेनं केली आहे. २०२५ ते २०३५ या दशकभरासाठी असणाऱ्या या आराखड्याचा हेतू दोन्ही देशातले संरक्षण संबंध दृढ करणं हा आहे.*

*अमेरिका भारतासोबतच्या संरक्षण सामुग्री विक्री आणि संयुक्त उत्पादनावर अधिक भर देईल, असं दोन्ही देशांच्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. तसंच राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी भारत – अमेरिके दरम्यानचे व्यापारी संबंध अधिक दृढ केले जातील, असंही यात म्हटलं आहे. येत्या ५ वर्षात दोन्ही देशांतला व्यापार दुपटीहून अधिक वाढवून ५०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला आहे. तसंच सप्टेंबरपूर्वी दोन्ही देशांमधल्या व्यापार कराराच्या चर्चांचा पहिला टप्पा पूर्ण करण्यालाही प्राधान्य दिलं जाईल. भारताला नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलं पुरवठ्यासाठी अमेरिकेला आघाडीचा पुरवठादार करण्यावरही दोन्ही देशांनी प्रतिबद्धता व्यक्त केली. दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी ठोस कृतीची गरज प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केली.*

***बाईट....***

*संरक्षण, AI, सेमीकंडक्टर, क्वांटम, जैवतंत्रज्ञान, ऊर्जा आणि अंतराळ क्षेत्रात दोन्ही देशातले शासकीय, शैक्षणिक आणि खासगी क्षेत्रातला द्विपक्षीय संवाद वाढवण्यासाठी TRUST उपक्रम सुरू करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. अमेरिकी विद्यापीठांची केंद्र देशात सुरू करणं, भारत आणि अमेरिका यांच्या शैक्षणिक संस्थांचे संयुक्त अभ्यासक्रम सुरू करण्यावरही यावेळी सहमती झाली. मुक्त, शांत आणि समृद्ध हिंद - प्रशांत प्रदेशासाठी दोन्ही देशातली भागीदारी उपयुक्त ठरेल असं यावेळी सांगण्यात आलं.*

**<><><><><><>**

कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुन्ह्यांची नोंद होणं आवश्यक आहे. त्यामुळं एफआयआर दाखल करण्यात कोणताही विलंब होता कामा नये, असे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत. नवीन फौजदारी कायद्यांच्या राज्यातल्या अंमलबजावणीसंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

राज्यातल्या सर्व पोलीस आयुक्तालयांमध्ये तीन नवीन गुन्हेगारी कायदे लवकरात लवकर लागू करावे. नव्या कायद्यानुसार खटले चालवण्यासाठी स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करावी, अशा सूचना अमित शाह यांनी केल्या. संघटित गुन्हेगारी, दहशतवाद आणि जमावाकडून होणाऱ्या हिंसेच्या घटनांवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नियमितपणे देखरेख ठेवावी. तसंच, कारागृहं, सरकारी रुग्णालयं, बँका आणि न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा इथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पुरावे नोंदवण्याची प्रणाली विकसित करावी, असे आदेशही या बैठकीत शहा यांनी दिले.

राज्यात तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून, ९० टक्के पोलिस दलानं नवीन कायद्यांचं प्रशिक्षण घेतलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईवरच्या दहशतवादी हल्ला प्रकरणातला आरोपी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेनं होकार दिला असून, त्याच्या विरोधात मुंबईत खटला चालवण्यासाठी संबंधित  यंत्रणा सज्ज असल्याचं त्यांनी सांगितलं. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><><>**

राज्याच्या रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाची परवानगी न घेता तिकीट लावून होणाऱ्या आणि अश्लील भाष्य करणाऱ्या कार्यक्रमांची चौकशी करण्याचे आदेश राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांनी दिले आहेत. भारतीय डिजिटल पार्टी या ओटीटी वाहिनीच्या निर्लज्ज कांदेपोहे या कार्यक्रमाविरोधात अनेक तक्रारी शेलार यांच्याकडे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंत्रालयात आज झालेल्या सांस्कृतिक विभागाच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करण्याचे आदेश शेलार यांनी दिले आहेत.

**<><><><><><>**

दिल्लीचे माजी मंत्री  सत्येंद्र जैन यांच्यावर खटला चालवण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केंद्रीय गृह मंत्रालयानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे केली आहे. जैन यांच्यावर खटला चालवण्याइतके पुरावे सक्तवसुली संचालनालयाकडून मिळाले आहेत, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. कथित आर्थिक अनियमितता आणि इतर आरोपांखाली जैन यांची चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

प्रयागराज इथल्या कुंभमेळ्याला विक्रमी ५० कोटी ४ लाख भाविकांनी भेट दिली आहे. जगातल्या कुठल्याही धार्मिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक सोहळ्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झालेले नाही, असं उत्तर प्रदेश सरकारनं म्हटलं आहे. कित्येक बड्या देशांची लोकसंख्या यापेक्षा कमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आज कुटुंबासह प्रयागराज इथं पवित्र स्नान केलं.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज सलग आठव्या सत्रात घसरण कायम राहिली. बाजार बंद होताना सेन्सेक्स २०० अंकांनी घसरला आणि ७५ हजार ९३९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १०२ अंकांनी घसरला आणि २२ हजार ९२९ अंकांवर बंद झाला.

शेअर बाजारातल्या गेल्या ८ सत्रांमधल्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांनी तब्बल २५ लाख ३१ हजार कोटी रुपयांची संपत्ती गमावली. या काळात सेन्सेक्समध्ये ३ टक्के, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये ३ पूर्णांक ४१ शतांश टक्के घट नोंदवली गेली.

**<><><><><>**

सरकारी मालकीच्या भारत संचार निगम लिमिटेडला २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत २६२ कोटी रुपयांचा नफा झाला आहे, अशी

माहिती केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथे ते माध्यमांशी बोलत होते. गेल्या १७ वर्षांत प्रथमच बीएसएनएलने तिमाही नफा नोंदवला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार दूरसंचार क्षेत्र हे भारताच्या डिजिटल भविष्याचा मार्ग असेल, असंही शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर तीन इराणी नागरिकांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ७ किलो १४३ ग्रॅम सोनं जप्त केलं आहे. या सोन्याची किंमत जवळपास ६ कोटी २८ लाख रुपये इतकी आहे. हे तिन्ही प्रवासी दुबईहून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होते.

**<><><><><>**

पंजाब मधे अमृतसर इथं ३० किलो हिरोईन हा अमली पदार्थ पोलिसांनी जप्त केला. अमृतसर इथं अमली पदार्थ पोहोचवण्यासाठी आरोपी जात असताना पोलिसांनी आज ही कारवाई केली.

**<><><><><>**

गडचिरोली इथं आज ३ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. यात दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश असून या तिघांना जेरबंद करण्यासाठी पोलिसांनी सुमारे ३८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

दृढनिश्चय आणि सातत्यपूर्ण प्रयत्न हे यशाचं गमक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. उत्तराखंड इथे आयोजित ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभावेळी ते बोलत होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांनी उत्तराखंडचं अभिनंदन केलं, तसंच ग्रीन गेम्स या उपक्रमाचं कौतुकही केलं. २०३६च्या ऑलिंपिक खेळांचं आयोजन करण्यासाठी भारत आता

पूर्णपणे तयार असल्याचं शहा यांनी यावेळी सांगितलं. यंदाच्या अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी ३ हजार ८०० कोटींची तरतूद केल्याचंही ते म्हणाले.

या समारंभात भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी या स्पर्धेच्या समारोपाची अधिकृत घोषणा केली. त्यानंतर अमित शहा यांनी मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांना या स्पर्धेचा ध्वज सुपूर्द केला. ३९व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचं आयोजन मेघालयात होणार आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वाधिक २०१ पदं पटकावली असून त्यात ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७६ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर असून सेना दलं ६८ सुवर्णपदकांसह पहिल्या तर हरयाणा ४८ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

**//<><><><><><>//**